कोल्हापूर वृत्तवेध

पुण्यनगरी

# धर्म आणि विज्ञानाची सांगड हवी : डॉ. साळुंखे

## कमला महाविद्यालयात दत्ताबाळ स्मृती व्याख्यानमाला

कोल्हापूर / प्रतिनिधी :

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर व कमला कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने श्री दत्ताबाळ स्मृती व्याख्यानमालेचे पुष्प यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांनी 'विज्ञानाचा समाजावरील परिणाम' या विषयावर गुंफले. अध्यक्षस्थानी ताराराणी विद्यापीठाचे उपाध्यक्ष एस. एन. पवार होते तसेच प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील, सचिव ताराराणी विद्यापीठ, डॉ. सुभाष देसाई यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम झाला.

प्रास्ताविक डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी केले. डॉ. माणिकराव साळुंखे मांडणी करताना म्हणाले, कोणत्याही समाजाला धर्म, समाजकारण, अर्थकारण यापासून वेगळ करता येत नाही. धर्माची आणि विज्ञानाची सांगड हवी. आज अमेरिका



दत्ताबाळ स्मृती व्याख्यानमालेत बोलताना डॉ. माणिकराव साळुंखे. डावीकडून प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील, एस. एन. पवार, डॉ. सुभाष देसाई

विज्ञानभ्रमातून जात आहे. आपल्याकडे आर्यभट्ट, ब्रह्मगुप्त, वराहमिहिर, कश्यप यासारखे वैज्ञानिक होऊन गेले. आर्यभट्टांनी सूर्य व पृथ्वीच्या गतीविषयी विचार मांडले. भारतात १४ व्या शतकात अंधार युगाचा कालखंड चालू झाला. त्यावेळी युरोपमध्येही अंधारयुग होते, यावेळी जगातील विज्ञान मागे पडले. यास केवळ अरबस्तान अपवाद ठरले. गॅलिलिव्होने स्वतः दुर्बीण तयार केली. त्यातून सूर्य, चंद्र, जहाज यांचे निरीक्षण केले आणि काही सत्ये उजेडात आणली; पण लोकांनी त्यांचा छळ केला. कोपरनिकसच्या सूर्यमध्य सिद्धांताला विरोध केला. गॅलिलिव्हो हा पहिला निरीक्षण करणारा शास्त्रज्ञ होय. आजही धर्म आणि विज्ञान यांच्यामध्ये संघर्ष आहे. जगावर मल्टिनॅशनल कंपन्या नियंत्रण ठेवत आहेत. विज्ञानाचे प्रयोग करताना दूषितकांमुळे पृथ्वीला धोका निर्माण होत आहे.

स्वागत व सूत्रसंचालन डॉ.तेजस्विनी मुडेकर, प्रास्ताविक प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. सुजय पाटील यांनी करून दिला, तर आभार डॉ. अनघा पाठक यांनी मानले.

शनिवार दि. ५ सप्टेंबर २०१५